# भोंदू बाबांपासून सावधान !

## ( भोंदू साधू, संत व महाराज अन् खोटे शंकराचार्य यांसह )

### प्रकरण १

## वैयक्तिक जीवन

### अनुक्रमणिका

[काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे (मुद्दे) '*' या चिन्हाने दर्शवली आहेत.]


**१. धर्माचरण न करणे** **१५**

**२. अयोग्य वर्तन** **१५**

* अस्वच्छता करणे १५
* उज्जैन येथील एका आश्रमात दूरचित्रवाणीवर हिंदी चित्रपट बघत विश्रांती घेणारे महंतांचे शिष्य आणि एक साधू ! १७
* षड्रिपूंवर नियंत्रण नसलेले संत १७
* चेष्टेने बोलून संतांचा अपमान करणे १८
* एका आश्रमातील एका विकलांग उन्नतांना भेटायला आलेल्या एका स्वामींचे अयोग्य वागणे १९
* संतांच्या वागण्याच्या संदर्भात अंधश्रद्धा नको ! २०

**३. भंपकपणा** **२२**

**४. भगवे वस्त्रधारी भोंदू बाबा** **२२**

* भोंदू बाबा बनण्याची प्रक्रिया २२
* संत आखाडा परिषद भोंदू बाबांची सूची घोषित करणार ! २५


### प्रकरण २

## भक्तांबरोबरचे आणि सामाजिक जीवन

### अनुक्रमणिका

[काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे (मुद्दे) '*' या चिन्हाने दर्शवली आहेत.]


**१. लोकेषणा** **२८**

* सत्तालोभापायी प्रत्यक्ष आपल्या गुरूंची अवज्ञा करून साधनामार्गापासून दूर गेलेले एक महंत ! २८

* धर्मप्रसारासाठी नव्हे, तर दिखाऊ थाटमाट करून धनाचा अपव्यय करणारे साधू ! २८
* हिंदु धर्माला ग्लानी आलेली असतांना लोकेषणा जपणारे तथाकथित हिंदुत्ववादी संत ! २९
* भक्तांबरोबर नव्हे, तर लोकेषणेपायी प्रसिद्ध व्यक्तींबरोबर छायाचित्रे काढून घेणारे महाराज ! २९

**२. अहंकार असणे** **३२**

* व्यासपिठावर इतरांपेक्षा आसन उच्च असायला हवे, असा हट्ट करणारे एक मुनी ३३
* धर्मसभेच्या वेळी केवळ वक्त्यांसाठी असलेल्या व्यासपिठावर बसण्यासाठी हट्टाग्रह करून गोंधळ घालणारे अहंकारी धर्माचार्य ! ३३

**३. स्वतःच्या नावाचा मंत्र देणे !** **३८**

**४. भोंदू तांत्रिक साधू** **३८**

* तांत्रिक उपासना असलेल्या एका बाबांमध्ये संतत्व नसल्याचे दर्शवणारे काही प्रसंग ३९

**५. तथाकथित चमत्कार आणि सिद्धी** **४३**

**६. आर्थिक लाभाकडे लक्ष** **४६**

* विधींच्या लाभांपासून लोकांना वंचित ठेवणारे तीर्थक्षेत्रातील महाराज आणि पुजारी ४६
* धर्माच्या नावावर भाविकांकडून पैसे लुटणारे ढोंगी साधू ! ४७
* मोठ्या पदावरील व्यक्तींच्या ओळखीचा अपलाभ घेऊन त्यांना लुबाडणारे भोंदू साधू ! ४८
* ईश्वरप्राप्तीसाठी नाही, तर धनप्राप्तीसाठी अध्यात्माची कास धरणारे पैशाचे लोभी भोंदू साधू-संत ! ५२

**७. गुंड साधू** **५६**

* गुंड साधू निर्माण होण्याची प्रक्रिया ५६
* देवाचे चित्र व मूर्ती यांपुढे सर्व प्रकारचे धंदे करणारे भोंदू साधू ! ५६

**८. खोटे शंकराचार्य** **५९**

* खोटे शंकराचार्य हे राजकीय पक्ष व प्रसिद्धीमाध्यमे यांचेच अपत्य ! ६३

**९. अश्लाघ्य वर्तनाने हिंदु संत आणि धर्म यांना काळिमा फासणारे तथाकथित स्वामी, साधू आणि महाराज** **६४**

* स्त्रीलंपट भोंदू स्वामी आणि साधू ६४

* उपायांच्या नावाखाली अश्लाघ्य वर्तन करणे ६५
**१०. सर्वसाधारण व्यक्ती, सूक्ष्मातील कळणारे, ७० टक्के पातळीचे संत आणि उपाय करणारे एक महाराज यांच्या साधनेच्या विविध प्रकारांचे प्रमाण** ७१
**११. (म्हणे) 'देशात २५ लाख साधू आहेत !'** ७२
**१२. बहुसंख्य साधू-संतांमध्ये अनेक दोष असल्याने संतसंगठन अशक्य !** ७२
**१३. खऱ्या साधू-संतांना नम्र प्रार्थना !** ७५

# मनोगत

'बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले ।', याचे उत्तम उदाहरण म्हणजे संत. संतांचे आचरण नेहमीच आदर्श, अनुकरणीय आणि समाजाला मार्गदर्शक असते. त्यांचे आचरण आणि मार्गदर्शन अनुसरून अनेक जण परमार्थमार्गावर वाटचाल करून ईश्वराची भक्ती करत ईश्वराशी एकरूप होतात; पण सध्याच्या कलियुगात समाजाला पारमार्थिक मार्गदर्शन करून घडवणारे असे संत दुर्मिळच आहेत. त्याऐवजी प्रतिष्ठा आणि सन्मान यांच्या मागे लागलेले तथाकथित संत समाजाला दिशादर्शन करण्याऐवजी संभ्रमित करतांना आढळतात.

साधू म्हणजे त्याग आणि प्रीती यांचा संगम ! ईश्वरप्राप्तीसाठी संसाराकडे पाठ फिरवून वैराग्यवृत्ती बाळगून संन्यासी बनलेल्यांप्रती समाजात आदराची भावना हवी; परंतु सध्या साधूची उपाधी धारण केलेली काही स्वार्थी मंडळी मात्र प्रसिद्धीसाठी हपापलेली दिसून येत आहेत. तीव्र अहंभाव आणि लोकेषणा असणे, ईश्वरप्राप्तीऐवजी धनप्राप्तीकडे लक्ष असणे, असे अनेक दुर्गुण असलेले तथाकथित साधू, संत, बाबा आणि महाराज यांची उदाहरणे या ग्रंथात दिली आहेत. लोकेषणा, अहंकार, लोभ आणि ईर्षा आदी विकारांनी ग्रस्त असलेल्या या साधू-संतांचे सेवाकार्य, त्याग अन् भक्ती केवळ दिखाऊपणा अन् इतरांनी प्रशंसा करावी, यांसाठी असल्याचे दिसून येत आहे.

भगवी वस्त्रे हे त्याग, निरिच्छा आणि अनासक्ती यांचे प्रतीक आहेत; परंतु भगवी वस्त्रे धारण करणाऱ्या काही जणांची आसक्ती कमी झाल्याचे जाणवत नाही. असे तथाकथित साधू-संत हिंदु धर्मासाठी वर्तमानकाळात किंवा भविष्यात काही त्याग करतील, अशी अपेक्षाच ठेवायला नको. त्यामुळेच 'साधू-संत होणे, हा पैसे मिळवण्याचा सोपा मार्ग किंवा उपजीविकेचे एक चांगले साधन आहे', असा अपसमज समाजात पसरत आहे. ज्यांनी आपल्या आचरणातून त्याग आणि अनासक्तीची शिकवण समाजाला द्यायला हवी, त्यांचे अशा प्रकारचे दुराचरण आणि निंद्य प्रदर्शन समाजाला

धार्मिकतेकडे वळवण्याऐवजी त्यापासून परावृत्त करून भोंदू साधू बनण्याला प्रोत्साहन देणारे आहे.

आपल्या अयोग्य आणि अश्लाघ्य वर्तणुकीने जनमानसात आदरणीय असलेल्या साधू-संतांच्या प्रतिमेला बट्टा लावणारे तथाकथित स्वामी, साधू आणि महाराज यांच्याविषयी आलेले अनुभव या ग्रंथात दिले आहेत. तथाकथित आणि भोंदू साधू-संतांच्या वागण्यातून व्यक्त होणाऱ्या या विरोधाभासामुळे सर्वसामान्य हिंदू धर्मापासून दूर जात आहेत, श्रद्धाहीन होत आहेत, तर भावी पिढीपुढे अध्यात्म हा थट्टेचा विषय होत चालला आहे. साधू-संतांची जनसामान्यांच्या मनातील प्रतिमा कलुषित करून हे भोंदू एकप्रकारे हिंदु धर्माची घोर विटंबना करत आहेत आणि स्वतःसोबतच हिंदु समाजालाही विनाशाच्या खाईत लोटत आहे. लोकांच्या श्रद्धेवर घाला घालणाऱ्या अशा भोंदूंना रोखण्यासाठी अध्यात्मातील अधिकारी व्यक्तींनी, म्हणजेच खऱ्या साधू-संतांनी आता पुढाकार घेऊन भोंदूंचे खरे स्वरूप उघड करणे, ही काळाची गरज आहे.

हा ग्रंथ वाचून हिंदूंना हिंदु धर्मातील काही भोंदू साधू-संत आणि खोटे शंकराचार्य यांची ओळख होईल. 'हिंदूंनी साधना करून समाजाला श्रद्धाहीन आणि अधर्माचरणी बनण्यास प्रोत्साहित करणाऱ्या अशा भोंदूंना ओळखावे आणि खऱ्या साधू-संतांच्या मार्गदर्शनानुसार आपले व्यावहारिक अन् पारमार्थिक आयुष्य व्यतीत करून जीवनाचे सार्थक करून घ्यावे', अशी ईश्वरचरणी प्रार्थना!

**- संकलक**